# वसई-विरार शहर महानगरपालिका

## प्रभागसमिती'आय'वसई

## ता.वसई,जि.पालघर

## जाहिर दरपत्रक

जा.क्र.ववशमनपा/ग्रंथा ४४१०१८/१८
दि.३/८/२०१८

सर्व पेपर रद्दी विक्रेते, दरपत्रकधारक, व्यक्ती आणि संस्था यांच्या माहितीसाठी कळविण्यांत येते की, वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'आय' वसई येथील कै. डॉ. धोंडो गोविंद स्मृती ग्रंथालय व वाचनालयातील रोजच्या वापरात असलेली इंग्रजी, मराठी व इतर भाषेतील वृत्तपत्रांची तसेच दिवाळीअंक रद्दी विक्री करावयाची आहे. त्याकरीता प्रभाग समिती 'आय' वसई येथील कै. डॉ. धोंडो गोविंद अभ्यंकर स्मृती ग्रंथालय व वाचनालयामार्फत जाहिर दरपत्रक मागविण्यात येत आहे.सदर दरपत्रकात सर्व दरपत्रकधारकांनी मराठी, इंग्रजी व इतर भाषेतील वृत्तपत्रांच्या तसेच दिवाळीअंक रद्दीचे दर प्रत्येकी वेगवेगळे भरावे. सदरची दरपत्रके दिनांक३/८/२०१८ ते दिनांक१४/८/२०१८ रोजी पर्यंत दुपारी २ वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'आय'वसई येथील आवक-जावक विभागात मुदतीत आणून दयावीत.प्राप्त सर्व निविदा शक्य झाल्यास दिनांक १४/८/२०१८ रोजी हजर असलेल्या निविदाधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी हयांचे समक्ष मा.सहा.आयुक्त 'आय' प्रभाग हयांचे दालनात संध्याकाळी ५.०० वाजता उघडणेत येतील.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | प्रमाण अंदाजित | दर |
|---|---|---|---|
| १ | ग्रंथालयातील जुनी वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहीके व दिवाळी अंक यांची रद्दी विक्री करणेबाबत. | प्रती किलो | इंग्रजी वृत्तपत्रांच्या रद्दीचा दर -<br>मराठी वृत्तपत्रांच्या रद्दीचा दर -<br>इतर भाषेतील वृत्तपत्रांच्या रद्दीचा दर -<br>दिवाळी अंक रद्दीचा दर - |

**अटी व शर्ती**

१) मालकाचे / संस्थेचे पॅनकार्ड व बँक पासबुक /आधार कार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावे.
२) दरपत्रक मंजूर झाल्यानंतर दरपत्रकधारकाने १५ दिवसांत कार्यालयात उपस्थित राहून करारनामा करावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.
३) दरपत्रकात नमूद रद्दीचे दरसादर करताना मूळकिंमत, वाहतूक खर्च व इतर सर्व करांसहीत रद्दीचे दर नमूद करावेत.
४) दरपत्रकात नमूद रद्दीचे दर सादर करताना इंग्रजी,मराठी व इतर भाषेतील वृत्तपत्रांचा दिवाळीअंक रद्दीसाठी प्रत्येकी स्वतंत्र दर नमूद करावयाचे आहे.
५) वरील कामाची दरपत्रके सिलबंद लिफाफ्यात दि.१४/८/२०१८ रोजी दुपारी .०० वाजता 'आय' वसई येथील कै.डॉ. धोंडो गोविंद अभ्यंकर स्मृती ग्रंथालय व वाचनालयातील 'आय' प्रभाग समिती येथील आवक जावक विभागात सादर करावीत.
६) मुदतीत प्राप्त झालेली सर्व दरपत्रके दि.१४/८/२०१८ रोजी दु. ५.०० वाजता मा.सहा.आयुक्त यांचे दालनात उपस्थित दरपत्रकधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी व दरपत्रक निवड समिती (निविदा समिती) हयांचे समक्ष उघडण्यांत येईल.
७) प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवलेला आहे.
८) वरील अटीचे पालन जे दरपत्रकधारक करणार नाहीत.त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यात येतील.

ठिकाण:- प्रभाग समिती 'आय' कार्यालय वसई
वसई-विरार शहर महानगरपालिका

(रतेश किणी)
सहा. आयुक्त
प्रभाग समिती'आय'

उपायुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका